# हॅलो प्रभात

दि. 22/

## 'विवेकानंद'मध्ये रंगले युवा साहित्य संमेलन

कोल्हापूर : हॅलो प्रभात

नव्या पिढीचे साहित्य विद्यार्थ्यांनी वाचले पाहिजे. मातृभाषेत जेवढे व्यक्त होता येते तेवढे दुसऱ्या भाषेमध्ये व्यक्त होता येत नाही. मातृभाषेच्या विकासासाठी जास्तीत जास्त वाचन व लेखन करणे गरजेचे आहे.

मातृभाषेच्या विकासाचे बाळकडू शैक्षणिक प्रक्रियेमध्ये विकसित होते. विविध छंद जोपासल्याने जीवनात सर्जनशीलतेला व सृजनशीलतेला वाव मिळतो. धावपळीच्या जीवनात आयुष्याला उभं करण्यासाठी माणूस सतत संघर्ष करीत आहे. हा संघर्ष साहित्यातून चित्रित होत असतो. त्यासाठी युवकांच्या साहित्यप्रज्ञेचा



शोध घेण्यासाठी आणि नवोदितांच्या सर्जनशीलतेला मुक्त व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी अशा युवा साहित्य संमेलनांची आवश्यकता असते, असे प्रतिपादन प्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ व लेखक प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले. ते विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ आणि आय. क्यु. ए. सी. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या चौथ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी उदघाटक म्हणून बोलत होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकांनद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व आय. क्यु. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनासाठी विद्यार्थी, प्राध्यापक आणि साहित्य रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

लोकमत
कोल्हापूर, शनिवार, दि. २२ फेब्रुवारी २०२५

# पथनाट्य स्पर्धेमध्ये मंडलिक कॉलेज प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी :** राज्यस्तरीय युवास्पंदन स्पर्धा उपक्रमाच्या समारोपदिवशी आविष्कार पथनाट्य स्पर्धेत मंडलिक कॉलेज (मुरगुड), तर लघुनाटिका स्पर्धेत कला स्पंदन क्रिएशन (पाटण) यांनी प्रथम क्रमांक मिळविला. मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फाउंडेशन आणि रोटरी क्लब सेंट्रलच्यावतीने या स्पर्धा आयोजित केल्या होत्या.



इचलकरंजीतील पथनाट्य स्पर्धेतील विजेत्या मंडलिक कॉलेजचा गौरव केला.

पथनाट्य स्पर्धेत भाग घेतलेल्या संघांनी भ्रष्टाचार, संविधान साक्षरता, पर्यावरण व आरोग्य, जातीयवाद, धर्मांधता आदी विषयांवर भाष्य करणारी पथनाट्ये सादर केली. स्पर्धेत नानासाहेब महाडिक शैक्षणिक संकुल (पेठनाका) व कला स्पंदन क्रिएशन (पाटण) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. लघुनाटिका स्पर्धेतील संघांनी समाजातील सद्यःस्थिती, सोशल मीडिया, मराठी भाषेची सद्यःस्थिती, स्त्री-पुरुष समानता, व्यसनमुक्ती, उपहास, उपरोध व विडंबन अशा विविध शैलींमधून मांडले. स्पर्धेत परिस स्पर्श (कराड) व विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर) यांनी द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. दोन्ही स्पर्धेसाठी प्रकाश पाटील (राधानगरी), सत्याप्पा मोरे (इस्लामपूर) व प्रवीण साळुंखे (पुणे) यांनी परीक्षक होते.

संजय होगाडे यांनी स्वागत व समीर गोवंडे यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांच्या हस्ते विजयी संघांना पारितोषिक दिले. घोरपडे नाट्यगृहात झालेल्या स्पर्धेसाठी इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली, कराड, इस्लामपूर या भागातील स्पर्धकांनी सहभाग घेतला.